

निपाणी : प्रा. डॉ. बी. एम. हिरेमठ यांच्या सत्कारप्रसंगी शाखाध्यक्ष प्राचार्य डॉ. पी. एम. हेरेकर, विद्यावती जनवाडे, व्ही. आर. पाटील, आर. एम. व्हदडी, किरण शहा व सेवकवर्ग.

# निपाणीत 'रवळनाथ'तर्फे डॉ. हिरेमठ यांचा सत्कार

निपाणी, ता. २६ : रवळनाथ हौसिंग फायनान्स सोसायटीच्या निपाणी शाखेचे सल्लागार, जी. आय. बागेवाडी कॉलेजमधील वाणिज्य विभागप्रमुख प्रा. डॉ. बी. एम. हिरेमठ यांची अथणी येथील शिवयोगी मृगेन्द्र स्वामी आर्टस् व कॉमर्स कॉलेज येथे बदली झाली आहे.

त्याबद्दल संस्थेचे शाखाध्यक्ष प्राचार्य पी. एम. हेरेकर यांच्या हस्ते सत्कार झाला. शाखा सल्लागार विद्यावती जनवाडे यांनी, आजअखेर जी. आय. बागेवाडी कॉलेज येथे वाणिज्य विभाग प्रमुख म्हणून प्रा. डॉ. बी. एम. हिरेमठ यांनी १३ वर्षे सेवा केल्याचे सांगितले. प्रा. डॉ. बी. एम. हिरेमठ यांनी रवळनाथ हौसिंग फायनान्सचे संस्थापक अध्यक्ष एम. एल. चौगुले यांनी आपल्याला रवळनाथ परिवारामध्ये निपाणी शाखेच्या सल्लागारपदी कार्य करण्याची संधी दिल्याचे सांगून आभार मानले. प्राचार्य हेरेकर यांनी प्रास्ताविक केले. व्ही. आर. पाटील, आर. एम. व्हदडी, किरण शहा यांच्यासह संचालक, सेवक उपस्थित होते.